बीड । शुक्रवार
२३.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ५२
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# बीड पोलिसांत खळबळजनक उलथापालथ !

## एका झटक्यात ६०० कर्मचाऱ्यांच्या बदल्या, स्थानिक गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड पोलीस दलाचा कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उभं राहिलं होतं. या प्रकरणामुळे पोलिसांची विश्वासार्हता धोक्यात आली होती. याच पार्श्वभूमीवर बीड जिल्हा पोलिसांत एक मोठा निर्णय घेत ६०० पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या करण्यात आल्या आहेत.



पोलीस दलात 'रूट शेकअप', गुन्हेगारांवर वचक बसवण्याचा प्रयत्न- बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी ही मोठी हालचाल राबवली असून पोलीस कॉन्स्टेबलपासून ते ग्रेड उपनिरीक्षकांपर्यंतच्या कर्मचाऱ्यांचा समावेश या बदल्यांमध्ये आहे. अनेक पोलीस कर्मचारी मागील अनेक वर्षांपासून एकाच पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्यामुळे स्थानिक गुन्हेगारांशी त्यांच्या संबंधांची शक्यता वर्तवली जात होती, आणि त्या अनुषंगानेच ही धडक कारवाई करण्यात आली आहे.

सरपंच हत्या प्रकरणानंतर पोलिसांवर गंभीर आरोप- संतोष देशमुख यांच्या अपहरणानंतर पोलिसांकडून त्वरित कारवाई झाली नसल्याने त्यांची हत्या टळली नाही, असा आरोप देशमुख यांच्या कुटुंबीयांनी केला होता. यामुळे पोलीस दलावर टीकेची झोड उठली होती. याच प्रकरणात काही पोलिसांना निलंबित देखील करण्यात आलं होतं.

जनतेचा दबाव, लोकप्रतिनिधींची मागणी अखेर सफल- बीड पोलीस दलातील भोंगळ कारभारावर संतप्त झालेल्या नागरिकांनी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी पोलिसांच्या बदल्यांची मागणी केली होती. अखेर या मागणीला प्रतिसाद देत एकाचवेळी ६०० कर्मचाऱ्यांची बदली करून पोलिस प्रशासनाने मोठा पाऊल उचललं आहे.

कायदा-सुव्यवस्थेला नवा श्वास?- ही बदल्यांची लाट बीड जिल्ह्याच्या कायदा व सुव्यवस्था सुधारण्याच्या दिशेने एक महत्त्वाचं पाऊल ठरू शकते, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमुळे स्थानिक गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवता येईल, आणि नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित होईल, अशी प्रतिक्रिया वर्तवली जात आहे.

ही फक्त बदल्यांची कारवाई नाही, तर बीड पोलीस दलात नवा शिस्तबद्ध अध्याय सुरू होण्याची शक्यता आहे. आता पाहावं लागेल की या निर्णयाचा प्रत्यक्ष कायदा-सुव्यवस्थेवर किती प्रभाव पडतो.

## ५०० कोटींच्या घोटाळ्याचा आरोप असणारे वैष्णवीचे मामासासरे, IG सुपेकरांचा दबाव; अंजली दमानियांचा दावा

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणाता पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून सासरे राजेंद्र हगवणे आणि थोरला दीर अद्याप फरार आहेत. याप्रकरणी, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आरोपींच्या अटकेसाठी पोलिसांना निर्देश दिले आहेत. कारण, राजेंद्र हगवणे हे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी होते. त्यामुळेच, पोलिसांवर दबाव टाकून त्यांच्याकडून हे प्रकरण




दाबलं जात असल्याचा आरोप वैष्णवीच्या वडिलांनी केला होता. आता, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी याप्रकरणी एका आयजी अधिकाऱ्याकडे अंगुलीनिर्देश केले आहेत. वैष्णवीच्या नवऱ्याचे मामा हे खत्र म्हणजेच पोलीस महानिरीक्षक आहेत, त्यांच्या मी माहिती घेतली असून या मामांचा धाक दाखवून दोन्ही सुनेवर हगवणे कुटुंबीयांनी अत्याचार केल्याचा दावा अंजली दमानिया यांनी केला आहे. जालिंदर सुपेकर या शशांकच्या IG मामावर ५०० कोटींच्या स्कॅम संदर्भात चौकशी सुरू आहे, एवढच नाहीतर जळगाव मध्ये झडख सादरे जे होते त्यांना, या IG नेच त्रास दिल्याचे पत्र लिहून त्यांनी आत्महत्या करणार असल्याचं म्हटलं होतं, अशी माहिती अंजली

▶▶ उर्वरित पान २ वर

## भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन च्या मदतीमुळे कामाला बळकटी मिळाली- आ.संदीप क्षीरसागर

### बिंदुसरा नदी स्वच्छता आणि खोलीकरणाच्या कामातील योगदानाबद्दल आ.क्षीरसागरांकडून आभार व्यक्त

**बीड । प्रतिनिधी**

सध्या आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून व नगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील बिंदुसरा नदीपात्रात स्वच्छता व खोलीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत योगदान म्हणून भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन यांनी स्वेच्छेने आपले योगदान देत या महत्त्वाच्या कामात



हातभार लावला आहे. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

मागील ३ दिवसांपासून बीड शहारातील बिंदुसरा नदीपात्रात स्वच्छता आणि खोलीकरणाचे काम आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून आणि नगरपालिकेच्या माध्यमातून युध्दपातळीवर सुरू आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## 'आई-बाबा, मला माफ करा; अपेक्षा पूर्ण करू शकत नाही'

### लातुरात विद्यार्थिनीने मृत्यूला कवटाळलं

**लातूर । प्रतिनिधी**

'आई-बाबा, मला माफ करा...., अशी चिठ्ठी लिहून ठेवत लातुरात इयत्ता बारावीत शिकत असलेल्या सृष्टी सुभाष शिंदे (वय १७) या विद्यार्थिनीने वसतिगृहात गळफास घेऊन आत्म



हत्या केली. ही घटना गुरुवारी दुपारी ४:३० वाजता घडली. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर येथील सृष्टी शिंदे ही ▶▶ उर्वरित पान २ वर

## राज्य मंडळाकडून दहावी, बारावीच्या पुरवणी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर; यंदा परीक्षा लवकर

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (राज्य मंडळ) दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा २४ जून ते १६ जुलै या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा २४ जून ते ८ जुलै या कालावधीत घेतली जाणार आहे.

राज्यमंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्य मंडळाने ५ मे रोजी बारावीचा, तर १३ मे रोजी दहावीचा निकाल जाहीर केला. या परीक्षांतील अनुत्तीर्ण, एटीकेटी प्राप्त विद्यार्थी, श्रेणी सुधार करू इच्छिणारे विद्यार्थी यांना संधी मिळण्यासाठी पुरवणी परीक्षा घेतली जाणार आहे. आतापर्यंत पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्टमध्ये घेतली जात होती. मात्र,

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये पुण्यासारखी घटना! दोन लहान मुलींसह मध्यरात्री विवाहितेला घराबाहेर काढलं

**बीड । प्रतिनिधी**

पुणे येथील वैष्णवी हगवणे हिचा छळ झाल्याने त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याची घटना समोर असतानाच बीडमध्येही माहेरून एक लाख रुपये आण म्हणत विवाहितेचा तिच्या सासरच्या मंडळींकडून शारीरिक व मानसिक छळ करून तिला आणि दोन लहान मुलींना रात्रीच्या वेळेस घराबाहेर हाकलल्याची घटना शहरात घडली. अंजुन आमेर बेग (वय २४, रा. बालेपीर आमराई, बीड) यांनी याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पती आमेर बेग अजीज बेग, सासू जमीला बेग आणि नणंद गुलनाज इमरान काझी अशी छळ करणाऱ्यांची नावे आहेत.

अंजुन बेग यांचा विवाह जानेवारी २०१८ मध्ये आमेर बेग अजीज बेग (रा. इस्लाम



पुरा, बीड) यांच्याशी मुस्लिम चालीरीतीप्रमाणे झाला होता. विवाहावेळी ५० हजार रुपयांचा हंडा व तीन तोळे सोनेही देण्यात आले. सुरुवातीचे सहा महिने सर्व काही सुरळीत होते. मात्र, नंतर नवरा आमेर बेग, सासू जमीला बेग आणि नणंद गुलनाज इमरान यांनी अंजुम यांना माहेरून एक लाख रुपये आणण्याचा दबाव टाकायला सुरुवात केली.वारंवार मारहाण, शिवीगाळ व मानसिक छळ करण्यात येऊ लागला.

▶▶ उर्वरित पान २ वर

## धुळ्याच्या शासकीय विश्रामगृहात सापडलं कोट्यवधींचं घबाड, अनिल गोटेंचा 'तो' आरोप खरा ठरला

**बीड । प्रतिनिधी**

धुळ्याच्या गुलमोहर शासकीय विश्रामगृहात आमदारांना देण्यासाठी पाच कोटी रुपये आणल्याचा गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि माजी आमदार अनिल गोटे यांनी केला होता. या पार्श्वभूमीवर अनिल गोटे यांनी विश्रामगृहातील खोली क्रमांक १०२ ला बाहेरून कुलूप लावून तेथेच ठाण मांडले होते. तसेच, ही खोली जिल्हाधिकारी किंवा पोलीस अधीक्षक यांच्या उपस्थितीतच उघडण्यात यावी, अशी मागणीही गोटे यांनी केली होती. अखेरी पोलीस अधिकारी, सार्वजनिक बांधकाम व महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या




उपस्थितीत या खोलीचा पंचनामा करण्यात आला. यावेळी खोली क्रमांक १०२ चे कुलूप कटरने तोडत अधिकाऱ्यांनी खोलीमध्ये प्रवेश केला. खोलीत घेतलेल्या झडतीत तब्बल एक कोटी ८४ लाख ८४ हजार २०० रुपयांची रोकड आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. महाराष्ट्र विधीमंडळातील अंदाज समिती तीन दिवसीय दौऱ्यासाठी सध्या धुळे जिल्ह्यात दाखल झाली आहे.

या दौऱ्यात समिती धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेणार आहे. एकूण २९ आमदारांचा समावेश असलेल्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड शहरातील नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवा: डॉ. योगेश क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील नागरी समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) शिष्टमंडळाने नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडे गुरुवारी (दि.२२) केली. पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात माजी नगरसेवकांचा समावेश होता. विविध विभागांतील समस्यांवर ठोस कृती आराखडा राबवावा,



असेही निवेदनात म्हटले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, शहरातील मान्सूनपूर्व स्वच्छता, नालेसफाई, पथदिवे, रस्त्यांची दुरवस्था, पाणी पुरवठ्याची विस्कळीत व्यवस्था, अपूर्ण गाळे व बाजारपेठांची कामे, तसेच आरोग्य सुविधा आणि कर वसुलीतील अडचणी आदी मुद्द्यांवर शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांना धारेवर धरले. सध्या शहरातील अनेक मुख्य नाले कचऱ्यामुळे तुंबले असून, त्यामुळे डास, दुर्गंधी व आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. हे नाले तातडीने यंत्राच्या सहाय्याने साफ करण्यात यावेत. तसेच, नव्या घंटागाड्या, जेसीबी व कम्पॅक्टर खरेदी करून स्वच्छतेसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

शहरातील अनेक भागांमध्ये पथदिवे बंद अवस्थेत आहेत तर काही भागांत दिवसा दिवे सुरू असतात. हायमास्ट दिव्यांचीही अवस्था दयनिय असून, त्यांची त्वरित दुरुस्ती आवश्यक आहे. सौर ऊर्जेचा वापर वाढवून मिनी हायमास्ट दिवे, स्मशानभूमीत प्रकाशयोजना व नगरपरिषद इमारतीवर सौर प्रकल्प बसविण्याचेही सुचविण्यात आले.

पाणी पुरवठा विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन

▶▶ उर्वरित पान २ वर

## विद्यापीठाने चार जिल्ह्यातील २३३ महाविद्यालयाचे प्रथम वर्षाचे प्रवेश रोखले

### दरवर्षी तोच घाणा आणि तेच आदेश : ॲड . अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर यांनी शैक्षणिक वर्ष २०२५/ २०२६ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील चार जिल्ह्यातील दोनशे तेहतीस महाविद्यालयांच्या प्रथम वर्षाचे प्रवेश पूर्णपणे रोखण्याचे आदेश दिले आहेत. दरवर्षी विद्यापीठाचा तोच घाना असतो. यातून काही करोडोची कमाई होत असल्याची चर्चा शैक्षणिक क्षेत्रामध्ये ऐकायला मिळते, असा आरोप ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित देशमुख यांनी केला आहे.

विद्यापीठाच्या उपकुलसचिव (शैक्षणिक विभाग) यांनी दिनांक १७/०५/२०२५ रोजी मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन न केलेल्या संलग्नित महाविद्यालयांची शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या शैक्षणिक

▶▶ उर्वरित पान २ वर



दैनिक
# मराठवाडा पत्र

संपादकिय | शुक्रवार, दि. २३ मे २०२५ | पान २

# सर्दी तर होणारच ना...!



पावसाळा आला की पावसाळी छत्र्या येणारच असं मराठीत गंमतीने म्हटलं जातं आणि ते देखील खरच आहे. जंगली मशरूम अर्थात पावसाळी छत्री या आशयाने इथं अर्थ घेतला जात असतो. मात्र येणाऱ्या पावसासोबत ज्या काही गोष्टी समोर येतात त्यात पावसाळ्यात होणारे आजार अर्थात साथरोग देखील येऊ शकतात आणि साथरोगाची ही आपत्ती रोखली नाही तर मोठा गोंधळ निर्माण होतो. पावसात भिजल्यानंतर सर्दी होणे हे अगदी सहाजिक आहे. प्रत्येक वेळी आपण छत्री अथवा रेनकोट घेऊन फिरत नाही आणि अनेकदा वाहनाच्या डिक्कीतला रेनकोट परिधान करेपर्यंत आपण भिजलेलो असतो. लहान बालकांची प्रतिकारशक्ती तुलनेत कमी असली तरी त्यांना याचा धोका कमी आहे. मात्र तथापि दुसऱ्या बाजूस घरातून पालकांकडून याचा प्रसार होऊ शकतो.

साधारणपणे सर्दी- पडसे हा पावसाळ्यातील सवयीचा आजार आहे आणि त्यावर मुख्यतः घरगुती इलाज होताना दिसतात. स्वतःहून औषधे घेणे आणि मुलांना देणे असे प्रकार प्रचलीत आहेत. अनेकदा टि.व्ही. वरील जाहिराती बघुनही औषधे घेतली तसेच दिली जाताना दिसतात परंतु नेमकेपणाने निदान करून मगच औषधे घ्यावीत हे उत्तम.

विविध प्रकारच्या औषधांचा स्वतःहून वापर करणे कुणासाठीही धोकादायकच म्हणावे लागेल कारण या औषधांचे चांगले परिणाम होवून आजारातून बरे होता येईल ही अपेक्षा असते. मात्र या प्रकारच्या औषधांचे दुष्परिणाम काय होतात याची माहिती नसल्याने त्याचा उलटा परिणाम होवू शकतो. आरोग्यासाठी हा धोका पत्करू नये. आपल्याकडे निष्काळजीपण, दुर्लक्ष करणे आणि दुखणे अंगावर काढणे असेही प्रकार दिसून येतात. यातूनही आजारपण वाढू शकते. त्यामुळे आजारी पडल्यावर न चुकता वैद्यकीय सल्ला घेणं केव्हाही उत्तम.

आपले शरीर मुख्यत्वे पाण्यावर अवलंबून असते. आणि पावसाळ्यात जे आजार आढळून येतात त्यापैकी साधारण ७० टक्के, आजार हे पाण्यामुळे होतात. त्यात पाण्यातील जिवाणुंमुळे होणारे आजार वेगळे आणि विषाणुंमूळे होणारे आजार वेगळे आहेत. या सर्वांचे मुळ अर्थात पाणी हेच आहे. पावसाळ्यात अनेक विषाणू सक्रिय होतात. त्यामुळे शुद्ध पिण्याचे पाणी हा आजारांना दूर ठेवण्याचा सर्वोत्तम उपाय आहे.

पावसाळ्यात अनेक ठिकाणी जलसाठे दुषित होतात. त्यामुळे आजारांचा धोका वाढत असतो. घरात पिण्याचे पाणी उकळून ते थंड करून घेणे चांगले. पाणी उकळल्याने त्यातील सर्व जिवाणू, विषाणू मरतात. त्यामुळे ज्या ठिकाणी शुद्ध पाणी नाही त्या ठिकाणी पाणी उकळूनच प्यावे.

पाण्यातील अशुध्दपणा दूर करण्याचा आणखी एक उपाय म्हणजे तुरटीचा वापर करणे होय. बाजारात तुरटी सहजरित्या उपलब्ध असते. कोणत्याही किराणा दुकानात ती आपणास खरेदी करता येईल. पाण्यात तुरटी फिरविल्यास गाळ खाली बसेल नंतर त्याचा वापर करता येईल. पाण्यात तुरटी फिरवणे सर्वच अर्थाने आपल्या आरोग्यासाठी सहाय्यकारी ठरणार आहे. तुरटीच्या पाण्याने अंघोळ केल्यास त्वचेवर होणारा संसर्ग कमी होतो. हे पाणी त्वचेतील मृतपेशी काढून टाकण्यास मदत करते. जखम लवकर भरणे आणि संसर्ग कमी करणे या दोन्हींमध्ये तुरटी लाभदायक आहे. आला पावसाळा म्हणजे आरोग्य सांभाळा असाच संदेश मानून पावसात भिजण्याचा आनंद घ्यायला देखील हरकत नाही.

**– प्रशांत विजया अनंत दैठणकर**
**( जिल्हा माहिती अधिकारी)**
**, बीड**

## पान ४ वरून पुढे...

### परिवहनेत्तर दुचाकी...

वर जमा करावा. सदर मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप महाराष्ट्र मोटार वाहन नियम व परिवहन आयुक्तांच्या परिपत्रकानुसार करण्यात येईल. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झालेल्या अर्जाची नोटीस दि. ०२ जून २०२५ रोजी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दुपारी ०४.०० वाजता प्रसिध्द करण्यात येईल. दि. ०३ जून २०२५ रोजी एकापेक्षा जास्त अर्ज असलेल्या अर्जदारांनी दुपारी २.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये मुळ शुल्का व्यतिरिक्त अधिक रकमेचा धनादेश जमा केल्यानंतर त्याच दिवशी दुपारी ०३.०० वाजता लिलावाची विहित कार्यपध्दती अवलंबून नोंदणी क्रमांकाचे वाटप करण्यात येईल. तरी सर्व वाहन धारकांनी, नागरिकांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

### माजलगाव शहरातील..

दुर्गंधीयुक्त नाल्यातील पाणी मुख्य रस्त्यालगतच्या सर्व तळघरातील गळ्यात व मुख्य रस्त्यावर साचत असल्यामुळे व्यापारी आणि ग्राहकाच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे त्यामुळे नगरपालिकेने वेळीच पावसाळ्यापूर्वीच स्वच्छता अभियान राबवून गाळा धारकांचे आणि ग्राहकांचे आरोग्य अबाधित ठेवावे अन्यथा नगरपालिकेला मोठ्या आंदोलनाला सामोरे जावे लागण्याची चिन्ह दिसत आहेत.

### शिवसेना (शिंदे...

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार व धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा सक्रियपणे प्रचार आणि प्रसार करत शिवसेना पक्ष वाढीसाठी कार्य कराल असा विश्वास शिवसेना पक्षाला वाटतो म्हणून आपली तालुकाप्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली असल्याचे पत्र शिवसेना सचिव संजय मोरे यांनी दिले व त्यांचे अभिनंदन ही केले आहे. शिवसेना तालुकाप्रमुख या पदावर माऊली गोंडे यांची निवड झाल्याची माहिती मिळताच त्यांचे सर्वस्तरातन अभिनंदन केले जात आहे.

शिवसेनेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवणार : तालुकाप्रमुख माऊली गोंडे – शिवसेनेशी एकनिष्ठ असणारा शिवसैनिक आजही प्रत्येक गावात आणि घराघरात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून भगवा अंगा खांद्यावर घेऊन एकनिष्ठ असलेले शिवसैनीक माऊली गोंडे आजही पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या विचारांशी बांधील आहे. आगामी काळात जुन्या आणि नव्या शिवसैनिकांची मोट बांधून पक्षाला उभारी देण्याचे काम प्रामाणिकपणे करणार आहे. शिवसेनेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवणार आहे असा निर्धार नवनिर्वाचित वडवणी तालुकाप्रमुख माऊली गोंडे यांनी व्यक्त केला.

### आर्ट ऑफ...

युवा उद्योजक पांडुरंग मोहिते,यांच्या उपस्थितीत आर्ट ऑफ फन डान्स एड क्टींग शिबर मोठ्या उत्साहात संपन्न झाला. आर्ट ऑफ फन अक्ॅडमी च्या बालकलाकार आतिशिय जिद्द आणि चिकाटीने नाटकात सहभागी होवुन उत्कृष्ट अभिनय सादर करत आहेत त्यामुळे या अक्ॅडमि च्या बालकलाकारांना सिनेमा मध्ये काम करण्याची संधी देवु असे अभिनेते सुधीर निकम म्हणाले. बीड जिल्ह्यात गेवराई ने ११४ वर्षाची नाटकाची परंपरा कायम ठेवली आहे आणि राज्य स्तरावर नाटकात सहभाग नोंदवुन आर्ट फन अक्ॅडमी च्या बालकलाकारांनी शैकडो पारितोषिक मिळवले आहे. आर्ट ऑफ फन अक्ॅडमिचे संचालक दिपक गिरी,शिवकुमार,रोहित पुराणिक,विवेक शर्मा यांनी बाल कलाकारांना स्टेज निर्माण करुन देण्यासाठी पुढाकार घेऊन अधिक मेहनत घेतली आहे असे बालरंभुमि राज्य उपाध्यक्ष दिपाताई क्षिरसागर म्हणाले. आर्ट ऑफ फन डान्स एड क्टींग शिबीरात सहभागी बालकलाकारांना साप्ताहिक गेवराई आदर्श यांच्या सौजन्याने प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात आले यावेळी गेवराई येथील जेष्ठ कलावंत प्रशांत रुईकर , मुकुंद टाक,सिने नाट्य कलावंत संतोषकजबे, उमेश मानधने व परीवार, पत्रकार लक्ष्मण ऊमाप, रोकडेश्वर प्रासादिक नाट्य मंडळाचे सदस्य,शिबिरात सहभागी सर्व विद्यार्थी, पालक व आदी उपस्थित होते.

### जिल्हा हद्दीत...

नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ड्रोन कॅमेरा, मानवविरहित यंत्र चालविण्यास, उडविण्यास मनाई करणेबाबत दिनांक १४ मे ते ३ जून २०२५ पर्यंत भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ लागू करणे बाबत राज्य गुप्तवार्ता विभाग मुंबई यांनी कळविले आहे. सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून संपूर्ण बीड जिल्ह्यात दिनांक १४ मे २०२५ पासून ते ३ जून २०२५ पर्यंत तातडीचे परिस्थितीत, नमूद कालावधी करिता भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ (१)(३) अन्वये आदेश लागू करणेस विनंती करण्यात आली आहे. तरी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) मधील शक्तीचा वापर करून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बीड जिल्हा हद्दीत दि. १६ मे २०२५ ते ३ जून २०२५ या कालावधीत ड्रोन कॅमेरा, मानवरहीत यंत्र चालविण्यास किंवा उडविण्यास मनाई आदेश एकतर्फी पारीत करण्यात येत आहे, असे बीडचे अपर जिल्हादंडाधिकारी यांनी नमुद केले आहे.

### स्थानिक स्वराज्य...

निवडणुकांमध्ये निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी दिली जाणार आहे. आष्टी मतदार संघातील लोक व कार्यकर्ते शरद पवार साहेबांना मानणारा आहे. आष्टी मतदार संघात सत्ता असो अथवा नसो पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. या कार्यकर्त्यांच्या जीवावर पक्ष उभा राहिला. निष्ठेने काम करून कार्यकर्त्यांनी निवडणुकीत विजय मिळवून दिला. परंतु विजय झाल्यानंतर अथवा सत्तेत गेल्यानंतर कार्यकर्त्यांचा विचार आमदारांनी केला नाही अशी खंत ही काही कार्यकर्त्यांनी या बैठकीदरम्यान व्यक्त केली. आगामी काळातील निवडणुकांत विजय होण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले. विधानसभा निवडणुकीत जे काही झाले ते सर्व मी विसरून गेलो आहे. सामान्य कुटुंबातील एक कार्यकर्ता म्हणून मी काम करतो. पक्ष मजबुत करून पक्षाला विजय प्राप्त करून देण्यासाठी माझी धडपड आहे. शरद पवार साहेब यांच्या नेतृत्वात आपला पक्ष कायम जनमानसात अग्रेसर आहे. निष्ठावान व मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्याला न्याय देण्यासाठी ही आजची आढावा बैठक आहे. पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी नेतृत्वाच्या मार्गदर्शना खाली काम करावं. असा सल्ला महेबूब शेख यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना दिला.

## पान १ वरून पुढे...

### ५०० कोटींच्या...

दमानिया यांनी व्हिडिओच्या माध्यमातून दिली.

जालिंदर सुपेकर हे पोलीस महानिरीक्षक असून ते वैष्णवीचे मामा सासरे म्हणजेच शशांक हगवणेचे सख्खे मामा आहेत. मयुरी जगताप जी हगवणेंची मोठी सून आहे, तिने पोलीस स्टेशनमध्ये नोंदवलेल्या एफआयआरवेळी देखील हगवणे कुटुंब फरार होते. तेव्हा, वैष्णवीच्या नणंदेने पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार दाखल केली होती. म्हणजेच, फरार व्यक्ती पोलीस स्टेशनमध्ये जाते आणि मयुरीच्या आई आणि भावा विरुद्ध FIR करते, आणि पुन्हा गायब होते. तसेच, तू आमचं काहीही बिघडू शकत नाही, आमचे हात फार मोठे आहेत, अशी धमकी देते, अशी माहिती अंजली दमानिया यांनी दिली आहे. मला असं वाटतं की, हे कुटुंब अतिशय विकृत मानसिकताचं आहे, यामध्ये सरकारने कारवाई केली पाहिजे, अशी मागणीही दमानिया यांनी केली.

हगवणे कुटुंबीय माझे दूरचे नातेवाईक – सुपेकर

हगवणे कुटुंबीय हे माझे दूरचे नातेवाईक असून, त्यांच्याशी निगडित प्रकरणात माझा कसलाही संबंध नाही. त्यासोबतच गेल्या कित्येक महिन्यांपासून आमचा त्यांच्याशी संवादही झाला नाही. मलाही दोन मुली असून, अशा गंभीर अन निर्घृण कृत्याचे समर्थन कोणताही बाप करूच शकत नाही. आरोपींना त्यांच्या कृत्याची सजा व्हायलाच हवी, ही माझी स्पष्ट भूमिका आहे, असे पोलीस महानिरीक्षाक डॉ. जालिंदर सुपेकर यांनी एबीपी माझाशी बोलताना म्हटले.

फोटो पाहून घातपात असल्याची शंका – दमानिया

वैष्णवीचे सगळ्यात ज्यास्त हाल तिच्या नणंद म्हणजे करिश्मा हगवणे करायच्या आणि त्यांच्यामुळे सासू लता आणि राजेंद्र हगवणे हे दोन्ही सूनांना छळायचे अशी माहिती मिळाली आहे. फरार होण्याची ही पहिली वेळ नाही. एवढेच नाही तर दुसऱ्या सुनेने तक्रार दाखल केली तेव्हा देखील ही माणस फरार झाली होती. सुनांनाच नाही तर सुशीलला देखील छळलं जायचं.ह्या कुटुंबाला खूप कठोर शिक्षा झाली पाहिजे. मला हा खालचा फोटो खूप संशयास्पद वाटतोय. हे काहीतरी वेगळे आहे, असे ट्विटही दमानिया यांनी केलं आहे. कारण, वैष्णवीच्य अंगवरील जखमांपैकी तीन छिद्र असलेली जखम संशयास्पद वाटते. वैष्णवीच्या वडिलांनी देखील हा घातपात असल्याचा संशय व्यक्त केल्याचेही दमानिया यांनी म्हटलं आहे.

### भारतीय जैन...

नदीपात्राची मान्सूनपूर्व स्वच्छता आणि खोलीकरण केल्याने मोठ्या प्रमाणात पाणी साठवणूक तर होणारच आहे, शिवाय शहरात असलेला पुराचा धोकाही मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. पाऊस सुरू होण्यापूर्वी सदरील काम पुर्ण होण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम स्वतः कामाच्या ठिकाणी उभे राहून काम करून घेत आहेत. दरम्यान या कामासाठी योगदान म्हणून भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन आदींनी स्वेच्छेने जेसीबी, ट्रॅक्टर इत्यादी साधनसामग्री निःशुल्क उपलब्ध करून दिली आहे. निश्चीतच यामुळे कामाची गती वाढणार असून, काम वेळेत आटोपण्यासाठी मोठी मदत होणार आहे. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी योगदान दिलेल्या भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री.शांतीलाल मुथ्था, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन यांसह सर्व शासकीय आणि अशासकीय संस्था, संघटनांचे आभार व्यक्त केले आहेत.

### 'आई-बाबा...

लातुरातील दयानंद विज्ञान शाखेत इयत्ता बारावीत शिक्षण घेत होती. गुरुवारी (२२ मे) ती ४:३० वाजण्याच्या सुमारास जेवण करून वसतिगृहातील खोलीत आली. ती खोलीत आली, त्यावेळी खोलीतील इतर मुली बाहेर गेल्या होत्या. त्याचवेळी सृष्टीने गळफास घेत आपले जीवन संपविले. सोबतच्या मुली थोड्या वेळाने खोलीवर आल्या. त्यांनी दार वाजवले, मात्र आतून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. मुलींनी याची माहिती वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना दिली. यावेळी कर्मचाऱ्यांनी पाहिले असता सृष्टी शिंदे या विद्यार्थिनीने गळफास घेतल्याचे आढळून आले. या घटनेची माहिती एमआयडीसी पोलीस ठाण्याला देण्यात आली. पोलीस निरीक्षक सुधाकर देडे, स.पो.नि. देवकत्ते, अंमलदार संतोष गोसावी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी लातुरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केला आहे. अभ्यासाच्या ताणतणावातून सृष्टी शिंदे हिने गळफास घेत जीवन संपवण्याचा टोकाचा निर्णय घेतल्याची प्राथमिक माहिती चिठ्ठीत नमूद केलेल्या मजकुरावरून समोर आली आहे, असे एमआयडीसी ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे म्हणाले.

सृष्टीने चिठ्ठीमध्ये लिहिले, आई–बाबा, मला माफ करा.....सृष्टी शिंदे हिने आत्महत्या करण्यापूर्वी चिठ्ठी लिहून ठेवली होती. 'आई–बाबा मला माफ करा, मी तुमच्या अपेक्षा पूर्ण करु शकत नाही,' असा मजकूर त्यामध्ये लिहिलेला असल्याचे पोलिसांनी सांगितले.

तीन दिवसांमध्ये दोघींच्या आत्महत्या– अभ्यासाच्या ताणतणावातून लातुरात गुरुवारी विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची घटना घडली; तर मंगळवारी शासकीय महिला तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या वसतिगृहात गायत्री विष्णुकांत इंद्राळे (१७, मंग्याळ ता. मुखेड, जि. नांदेड) या विद्यार्थिनीने ओढणीने गळफास घेतल्याची घटना घडली होती.

### राज्य मंडळाकडून...

यंदा ही परीक्षा लवकर घेतली जाणार आहे. सविस्तर वेळापत्रक https://www.mahahsscboard.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकाची सुविधा केवळ माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाकडे छापील स्वरुपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून तारखांची खात्री करून घ्यावी. अन्य संकेतस्थळांवरील, अन्य यंत्रणेने छपाई केलेले, अन्य माध्यमांतील वेळापत्रक ग्राह्य धरू नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. राज्य मंडळाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, २४ जून ते ११ जुलै या कालावधीत बारावीची प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. बारावीच्या माहिती तंत्रज्ञान आणि सामान्यज्ञान या विषयांची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने अनुक्रमे १५ जून, १६ जून रोजी घेतली जाणार आहे. तर २४ जून ते ८ जुलै या कालावधीत दहावीचे प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन केले जाणार आहे.

### धुळ्याच्या शासकीय...

या समितीचे नेतृत्व आमदार अर्जुन खोतकर करत आहेत. त्यापैकी ११ आमदार सध्या धुळ्यात दाखल झाले आहेत. दरम्यान, या आमदारांना देण्यासाठीच पाच कोटी रुपयांची रक्कम गुलमोहर विश्रामगृहात आणण्यात आली होती, असा गंभीर आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी केला आहे. एक कोटी ८४ लाख ८४ हजार रुपयांची रोकड सापडली– खोली क्रमांक १०२ मध्ये रोकड असल्याची माहिती मिळाल्यानंतर, माजी आमदार अनिल गोटे यांनी प्रशासनाकडे तत्काळ चौकशीची मागणी केली होती. या मागणीस पाठिंबा देण्यासाठी त्यांनी खोली क्रमांक १०२ च्या बाहेर तब्बल पाच तास ठिय्या आंदोलन केले. अखेर पोलीस अधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम व महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा प्रक्रिया पार पडली. यावेळी खोलीचे कुलूप कटरच्या सहाय्याने तोडण्यात आले आणि अधिकाऱ्यांनी खोलीत प्रवेश केला. त्यानंतर झालेल्या तपासणीत एक कोटी ८४ लाख ८४ हजार २०० रुपयांची रोकड सापडली आहे. तब्बल सहा तासांच्या मोजणीनंतर पोलिसांनी पंचनामा करून रोकड जप्त केली आहे. आज पहाटेपर्यंत शासकीय गुलमोहर विश्रामगृह याठिकाणी रोख रक्कम जप्त करण्याची कारवाई सुरू होती. याप्रकरणी आज धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. तसेच जप्त करण्यात आलेली रक्कम देखील पोलिसांनी ताब्यात घेतली असून याप्रकरणी आता पोलीस प्रशासन काय कारवाई करते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अर्जुन खोतकरांनी अनिल गोटेंचे आरोप फेटाळले– महाराष्ट्र विधीमंडळातील अंदाज समिती नेतृत्व करणारे आमदार अर्जुन खोतकर यांनी याबाबत आपली प्रतिक्रिया दिली आहे. अनिल गोटे यांनी केलेले सर्व आरोप अर्जुन खोतकर यांनी फेटाळले आहेत. विश्रामगृहात सापडलेले पैसे आणि समितीचा काहीच सबंध नसल्याचा दावा अर्जुन खोतकर यांनी एबीपी माझाशी बोलताना केला आहे. माझा पीए त्या रूममध्ये राहत नव्हता, हे सर्व प्लांट केले गेले असल्याचा आरोप खोतकर यांनी केला आहे.

रोहित पवारांची प्रतिक्रिया– या प्रकरणावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटलंय की, एखाद्या चांगल्या कामगिरीसाठी रोख रकमेचं बक्षीस दिलं जातं... धुळ्यात गेलेल्या अंदाज समितीनेही अशी काही दैदिप्यमान कामगिरी केली असेल का? आणि म्हणून त्यांना 'बक्षिस' देण्यासाठी कोट्यवधी रुपये रक्कम जमा केले असतील का? हा संशोधनाचा विषय आहे. पण अवकाळी पावसाप्रमाणे आ. अनिल गोटे साहेब त्या १०२ क्रमांकाच्या खोलीत अचानक हजर झाले आणि त्यांच्यामुळं अंदाज समितीच्या 'दैदिप्यमान कामगिरी'वर आणि 'बक्षिस' म्हणून मिळणाऱ्या रकमेवरही पाणी फेरलं गेलं, असे त्यांनी म्हटले आहे.

### बीडमध्ये पुण्यासारखी...

नणंदेकडून पतीला दुसऱ्या लग्नासाठी उचकवण्यात येत असल्याचेही तिने फिर्यादीत नमूद केले आहे. दरम्यान, ता. २५ एप्रिलला रात्री ११ वाजता अंजुन आणि तिच्या दोन चिमुकल्या मुलींना घराबाहेर काढून देण्यात आले. यावेळी तिला जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली.या प्रकरणी पती आमेर बेग अजीज बेग, सासू जमीला बेग आणि नणंद गुलनाज इमरान काझी यांच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली असून, पुढील तपास सुरू आहे.

### बीड शहरातील...

वेळेवर व्हावे, माजलगाव व बिंदुसरा प्रकल्पाच्या मदतीने नव्या पाणी योजनांचा प्रस्ताव तयार करून शासनाला सादर करावा, अशा सूचना शिष्टमंडळाने केल्या. श्रीरामनगर येथील जुन्या पाण्याच्या टाकीऐवजी नवीन टाकी उभारण्याची, तसेच अनधिकृत नळजोडण्या नियमित करून कराच्या कक्षेत आणण्याची मागणी करण्यात आली. बांधकाम विभागाच्या कामांबाबतही विविध सूचना देण्यात आल्या. यशवंत नाट्यगृह, आंबेडकर सांस्कृतिक भवन यांची दुरुस्ती करावी, प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करावे, नव्या भाजी मंडई व गाळ्यांचे बांधकाम पूर्ण करून सुरू करावे, तसेच रस्त्यांवरील खड्डे, सिमेंट रोडच्या सांधेबांध तातडीने कराव्यात. बेघर महिला निवारा गृह व नव्या स्मशानभूमीची उभारणी गरजेची असल्याचे सांगण्यात आले. आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे अपुरी पडत असल्याने नव्या केंद्रांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी सूचना करताना पेठ बीड, शाहूनगर भागांसाठी आरोग्य केंद्रांची गरज अधोरेखित करण्यात आली. कर वसुलीसाठी डिजिटल पद्धतीचा वापर करून गुगल पे, गुगल पेसारखी प विकसित करावी, तसेच व्यवसायिक गाळ्यांची नव्याने नोंदणी करून नगरपरिषदेला उत्पन्न वाढवण्याचा सल्ला देण्यात आला. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार फायर ब्रिगेडची नवी वाहने, भुयारी गटार योजना व एसटीपीसाठी जागा निश्चित करणे, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण व मियावाकी पद्धतीने दाट लागवड करणे अशाही सूचनांचा समावेश निवेदनात करण्यात आला. शहरातील नागरिकांनी वारंवार मांडलेल्या या समस्या तातडीने सोडवण्यात याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने केली आहे. यावेळी माजी नगरसेवक बाबुराव दुधाळ, गणेश वाघमारे, भीमराव वाघचौरे, नरसिंग नाईकवाडे, सादेक जमा, भास्करराव जाधव, इकबाल शेख, विकास जोगदंड, प्रेम चांदणे, सतिश पवार, राणा चौहान, मुन्ना इनामदार, रवींद्र कदम, शुभम धुत, जैतुल्ला खान, बिभीषण लांडगे, नितिन साखरे, दत्ता जाधव, नसीर अन्सारी, बाळासाहेब आंबेकर, साऊद भाई, महेश गर्जे, नागेश तांबारे, मंगेश धोंगडे, विनोद हातागळे, डॉ.रमेश शिंदे, विठ्ठल गुजर, गजानन जवकर, शुभम कातांगळे, नामदेव गायकवाड, विशाल राऊत, भीमराव दळे, दगडू म्हेत्रे, प्रकाश कानगावकर, विद्याभूषण बेदरकर, जाफर इनामदार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, नगरपरिषदेचे सर्व विभागाचे प्रमुख, नागरिक उपस्थित होते.

### विद्यापीठाने चार...

वर्षासाठी प्रथम वर्षाची प्रवेश क्षमता स्थगित करण्याबाबतचे आदेश जाहीर केले आहेत. विद्यापीठाच्या कार्यक्षमतेचा अभ्यास केला असता दरवर्षी हे आदेश काढले जातात. काही महिन्यात हे आदेश गुंडाळून ठेवले जातात. त्यामुळे विद्यापीठाच्या गुणवत्तेची वाट लागली आहे. त्याला दस्तुर खुद्द विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप देखील देशमुख यांनी केला आहे. नॅक मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकन करून विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र चांगल्या सुविधा दिल्या जात नाहीत. याची तपासणी विद्यापीठाच्या अधिष्ठाता मंडळ समोर होते. या तपासणीतून महाविद्यालयांची नावे काढली जातात. त्यांची प्रवेश क्षमता शून्य करण्यात येते. मात्र दरवर्षी तोच घाणा घालून विद्यापीठ शैक्षणिक गुणवत्ता ढासळवत आहे. विद्यापीठाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ८७ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यातील ६४ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. त्याचप्रमाणे जालना जिल्ह्यातील ५१ इतके महाविद्यालयांची तर धाराशिव येथील ३१ इतक्या महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तब्बल २३३ महाविद्यालय नियमाचे उल्लंघन करून महाविद्यालय चालवीत असल्याचे या निमित्ताने पुन्हा एकदा उघडकीस आली आहे. महाविद्यालय चालवणाऱ्या संस्थाचालकांना त्याचबरोबर तेथील प्राचार्य, प्राध्यापक यांना आणि विद्यापीठाच्या कुलगुरू पासून ते वेगवेगळ्या विभागाचे उपकुलसचिवांपर्यंत एक साखळी निर्माण झाली आहे. ही साखळी विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधा पुरवीत नाही. तरी देखील कोट्यावधी रूपयांचे पगार दर महिन्याला केले जातात. जाणीवपूर्वक केले जाणारे हे कृत्य विद्यापीठ थांबवत नाही, तोपर्यंत मराठवाड्यातील गुणवत्ता वाढणार नाही, असेही अॅड. अजित देशमुख यांनी म्हंटले आहे.

#### जिल्ह्यातील प्रवेश रोखलेल्या महाविद्यालयांची यादी

आदित्य कॉलेजचे एम.बी.ए., व अध्यापक, शाहू अध्यापक महाविद्यालय मोरेवाडी अंबाजोगाई, कला वाणिज्य आणि विज्ञान कॉलेज कुसळंब, अब्दुल कलाम कॉम्प्युटर सायन्स कॉलेज नेकनूर, कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वुमन्स बीड, केशवराज सीनियर कॉलेज दासखेड, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी बीड, साईराम आर्ट्स सायन्स कॉलेज, भाऊसाहेब पाटील कॉलेज केज, रामचंद्र धस कॉम्प्युटर कॉलेज आष्टी, संभाजी संभाजी राजे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स शिरूर कासार, श्री बीएसपीएम अध्यापक महाविद्यालय अंबाजोगाई, जनता आर्ट, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज धानोरा, अध्यापक महाविद्यालय कारी, आदित्य इंजीनियरिंग कॉलेज बीड, एसएसपीएमएस कॉलेज ऑफ एज्युकेशन आष्टी, जनविकास महाविद्यालय आपेगाव, राजमाता जिजाऊ आर्ट सायन्स अँड कॉमर्स कॉलेज मादळमोही, संत भगवान बाबा कॉलेज केज, गुरु विरोपक्ष कला महाविद्यालय मानूर, गुरुकुल कॉलेज ऑफ एज्युकेशन बीड, तुलसी कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी बीड, गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ एज्युकेशन अंबाजोगाई, स्वामी विवेकानंद कॉलेज परळी, तांबवेश्वर कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स केज, भगवानराव केदार कॉलेज वारणी, कला आणि विज्ञान महाविद्यालय आष्टी, पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर अध्यापक महाविद्यालय गढी, संत भगवान बाबा कला विज्ञान कॉलेज घाटशीळ पारगाव, शंकरराव गुट्टे ग्रामीण महाविद्यालय धर्मापुरी, गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी माजलगाव, मिठूलालजी सारडा एमबीए कॉलेज बीड, याशिवाय अनेक महाविद्यालयाचा यात समावेश आहे. या सर्व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नयेत, असे अॅड. देशमुख यांनी म्हटले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे**, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मालवणमधील पर्यटन हंगाम आता शेवटच्या टप्प्यात; किल्ले दर्शन, साहसी जलक्रीडा कधी बंद होणार...

**मालवण । प्रतिनिधी**

मालवण मधील पर्यटन हंगाम शेवटच्या टप्प्यात आहे. यामुळे येथील समुद्र किनारे पर्यटकांनी गजबजलेले आहेत. दरम्यान पर्यटन हंगामाची सांगता २५ मे पासून होणार आहे. त्यामुळे येथील किल्ले. दर्शन, साहसी जलक्रीडा प्रकार बंद होणार आहेत. शिवाय हवामान विभागाने यावेळी २० मे नंतर पावसाला सुरवात होण्याचा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे या सर्व गोष्टींचा विचार करता पर्यटन हंगामात केवळ सहा सात दिवसांचा व्यवसाय पर्यटन व्यावसायिकांना मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. पर्यटन व्यवसायाची व्याप्ती पाहता पावसाळी पर्यटनासाठी शासनाने नियोजन करणे




आवश्यक आहे. यावर्षीच्या पर्यटन हंगामाची सुरवात तर दिमाखात झाली. ऑक्टोबरपासून सुरवात झालेल्या या हंगामात पर्यटकांची मोठी गर्दी जिल्ह्यात झाली. पर्यटकांचा ओढा हा किनारपट्टी भागाकडे असल्याने तारकर्ली, देवबाग, वायरी भुतनाथ, दांडी, बंदर जेटी, चिवला बीच, आचरा, तळाशील बीच याकडे पर्यटकांची मोठी गर्दी झाल्याचे तसेच त्यांच्याकडून साहसी जलक्रीडा प्रकारांचा आनंद लुटता जात असल्याचे दिसून आले. यातून पर्यटन व्यावसायिकांचा चांगला व्यवसायही झाला.

उन्हाळी सुट्टी उशिरा पडल्याने फटका- जानेवारी, फेब्रुवारी महिन्यातही येथे पर्यटकांचा ओघ बर्यापैकी होता. मात्र दहावी, बारावी परिक्षांमुळे किरकोळ पर्यटकच येथे दाखल झाले. या परिक्षा झाल्यानंतर पर्यटकांचा ओघ वाढेल अशी अपेक्षा पर्यटन व्यावसायिकांकडून बाळगली जात होती. मात्र माध्यमिक शाळा एप्रिल महिन्याच्या २५ तारखेपर्यंत सुरू राहिल्याने मे महिन्यातील सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी कुटुंबवत्सल पर्यटक फारच कमी प्रमाणात दाखल झाले. याचा फटका पर्यटन व्यावसायिकांना बसल्याचे दिसून आले.

पहलगाम हल्ल्यानंतर अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द- पहलगाम हल्ल्यानंतर युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने अधिकारी वर्गाच्या सुट्ट्या रद्द झाल्या. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह राज्याच्या अन्य भागातून येथे येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून आले. ऐन पर्यटन हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात पर्यटकांची संख्या रोडावल्याने त्याचा फटका साहसी जलक्रीडा प्रकारासह अन्य छोट्या पर्यटन व्यावसायिकांना बसला आहे.

सलग सुट्ट्यांच्या कालावधीत गर्दी- वातावरणातील वाढती उष्णता यामुळेही पर्यटक कमी प्रमाणात येथे दाखल होत असल्याचे दिसून येत आहे. मे महिन्यात येथील पर्यटन हंगाम हाऊसफुल असल्याचे गेल्या काही वर्षात दिसून आले. मात्र यावेळी पर्यटक केवल शुक्रवार ते रविवार या सलग सुट्टीच्या काळातच येथे मोठ्या प्रमाणात येत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे किनारपट्टी भागात या पर्यटकांची गर्दी होत आहे.

निवासासाठी आगाऊ आरक्षण नाहीच- मे महिन्यातील पर्यटन हंगामात किनारपट्टी भागात पर्यटकांकडून निवासाचे आगाऊ आरक्षण केले जात होते. मात्र यावेळी अशी परिस्थिती किनारपट्टी भागात दिसून आली नाही. येथे येणारे पर्यटक केवळ साहसी जलक्रीडा प्रकारांचा आनंद लुटून, किल्ले सिंधुदुर्ग, रॉकगार्डन तसेच अन्य पर्यटन स्थळांना भेट देऊन माघारी परतत असल्याचे दिसून आले.

राजकोट येथे शिवपुतळा राहणार आकर्षण- राजकोट येथे नव्याने पुन्हा उभारण्यात आलेला ९१ फूट उंचीचा शिवाजी महाराजांचा पुतळा हा आता पर्यटकांचा आकर्षणाचा केंद्रबिंदू राहणार आहे. पावसाळ्यात सागरी पर्यटन बंद असले तरी शिवपुतळा पाहण्याची संधी पर्यटकांना असणार आहे. त्यामुळे शिवपुतळा पाहण्यासाठी यावर्षी पावसाळ्यातही पर्यटक दाखल होण्याची शक्यता आहे.

## ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या निवडीचा बीडमध्ये जल्लोषात आनंदोत्सव साजरा

### समता परिषदेसह ओबीसी समाजातील विविध संघटनांनी एकत्रित येत पेढे वाटून फटाके फोडून केला जल्लोष

**माजलगाव । प्रतिनिधी**

ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल बीड शहरांमध्ये या निवडीचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. समता परिषदेसह ओबीसी समाजातील विविध संघटनांनी एकत्रित येत फटाके फोडून आणि पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. याप्रसंगी ओबीसी समाजातील ज्येष्ठ कार्यकर्ते नाम देवराव दुधाळ, परीट समाजाचे प्रदेशाध्यक्ष गणेश जगताप, सोनार समाजाचे नेते अॅड. संदीप बेदरे, माळी महासंघाचे ज्येष्ठ नेते प्रा. लक्ष्मणराव गुंजाळ, भाजपाच्या नेत्या संजीवनीताई राऊत,



माजलगावचे समता परिषदेचे नेते संतोष रासवे, मोहनराव गोरे, संतराम पानखडे, दिनकर जमदाडे, बाबासाहेब दुधाळ, विठ्ठल भराटे, अशोक भानुसे, बीड शहर बचाव मंचचे अध्यक्ष नितीन जायभाये, नारायणराव शिंदे, समता परिषदेचे युवा नेते संदीप दुधाळ, अजय राऊत, सार्वजनिक जयंती महोत्सवाचे माजी अध्यक्ष तुषार दोडके, समीर राऊत, महादेव आढाव, मच्छिंद्र आढाव, दत्ता लव्हाळे, जगन खेत्रे, अशोक रासवे, महेश व्यवहारे, स्वप्निल शिंदे, महेश चौधरी, गोटू साखरे, अमोल राऊत, ह. भ. प. खरमाटे महाराज, रवी काळे यांच्यासह मोठ्या संख्येने ओबीसी समाज बांधव उपस्थित होते.

## २०० रुपयांची बियर फक्त ५० रुपयांना मिळणार, इतकी स्वस्त बियर मिळण्याचं नेमकं कारण काय?

**मुंबई । प्रतिनिधी**

बियर प्रेमींसाठी महत्वाची बातमी समोर आली आहे. आता देशात विकली जाणारी ब्रिटिश बिअर ७५ टक्क्यांपर्यंत स्वस्त होणार आहे. बियर इतकी स्वस्त होण्याचं नेमकं कारण काय? असा तुम्हाला प्रश्न पडला असेल. भारत आणि ब्रिटनमधील एफटीए अंतर्गत आयात शुल्क कमी करण्याचा करार झाला आहे. त्यानंतर देशात विकल्या जाणाऱ्या ब्रिटिश बियर आणि स्कॉचच्या किंमतीत लक्षणीय घट होणार आहे.

आता २०० रुपयांची ही परदेशी बियर फक्त ५० रुपयांना मिळणार आहे. भारत आणि ब्रिटनमधील एफटीए करारात, स्कॉच व्हिस्कीवरील आयात



शुल्कही निम्म्याने कमी करण्यात आले आहे. त्याच वेळी, ब्रिटिश गाड्यांवरील आयात शुल्क देखील कमी करण्यात आले आहे. तर ब्रिटनने भारतीय कापड आणि चामड्याच्या वस्तूंवरील आयात शुल्क कमी केले आहे.

ब्रिटिश बिअरवरील कर किती कमी केला?

एफटीए प्रमाणेच, भारत आणि ब्रिटनमध्ये अलीकडेच एक करार झाला आहे. ज्यामध्ये ब्रिटिश बिअरवरील आयात शुल्क १५० टक्क्यांवरुन ७५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. याचा थेट फायदा बियर प्रेमींना होईल. पूर्वी २०० रुपयांना विकली जाणारी ब्रिटिश बियर आता फक्त ५० रुपयांना खरेदी करता येईल. गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेल्या चर्चेनंतर आयात शुल्कात ही कपात करण्यात आली आहे. एफटीए अंतर्गत झालेल्या या करारामुळे देशात ब्रिटिश बिअरची मागणी वाढण्याची अपेक्षा आहे. भारत आणि ब्रिटनमधील एफटीए करारात स्कॉच व्हिस्कीवरील आयात शुल्कही निम्म्याने कमी करण्यात आले आहे. त्याच वेळी, ब्रिटिश गाड्यांवरील आयात शुल्क देखील कमी करण्यात आले आहे. तर ब्रिटनने भारतीय कापड आणि चामड्याच्या वस्तूंवरील आयात शुल्क कमी केले आहे.

## AHTU बीड, पथकाने रोखले एकत्र होणारे दोन बालविवाह

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन बीड ग्रामीण हद्दीत पांगरबावडी या गावी सखाराम मोगलाजी संकोड, व गंगाराम गंगाधर अनारसे यांचे घरी एकत्र दोन बालविवाह होत असल्याचे गोपनीय माहिती ATHU पथकास मिळाली होती,त्या नुसार अढक्ण पथकाने सदर ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते व पांगर बावडी गावाचे बालविवाह अधिकारी यांनी भेट दिली असता लग्नातील दोन्ही नवरी मुली अल्पवयीन मिळून आल्या, शिक्षणाचा अभाव, भटके जीवन, तसेच कायद्याबद्दलचे अज्ञान, तरुण मुलींना वयात आल्यानंतर सांभाळायचे कसे?अशी अनेक कारणांमुळे मुलीचा विवाह लावत असल्याचे पालकांनी सांगितले, दोन्ही कडील आई वडील नातेवाईक, यांना क्ढण पथकाने कमी वयातील लग्नामुळे मुलींच्या शरीरावर होणारे गंभीर परिणाम, लहान वयात पडणाऱ्या जबाबदाऱ्या, कुपोषित अपत्य, शिक्षणाचे महत्त्व अशा सर्व समुपदेशन करून मुलीचा विवाह अठरा वर्षे झाल्याशिवाय लावून देणार नाही, असे हमीपत्र घेवून सदरचे दोन्ही बालविवाह रोखण्यात आले, ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली क्ढण पथक प्रमुख PI वर्षा व्हगाडे, पोलीस अंमलदार अशोक शिंदे, प्रदीप येवले, मनीषा खरमाटे, रूपाली टोणे,यांचेसह बालविवाह अधिकारी ग्रामसेवक एस. बी. सपकाळ, व सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे यांनी केली.

## शेतकऱ्यांना मिळणार पशमी श्वान



पश्मी श्वानासंदर्भाने डॉ. पंडीत नांदेडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, जाणवळ (ता. चाकूर, लातूर) व आजूबाजूच्या भाग हा पश्मी श्वानांचे हे मूळ आहे. लातूर, परभणी, नांदेड, सातारा, सांगली, सोलापूर, पुण्यासह महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यात ते आढळते. कर्नाटक, तेलंगणा, उत्तराखंड, तमिळनाडू, दिल्ली, छत्तीसगड, पश्चिम बंगाल व आंध्र प्रदेश राज्यांतही त्यांना संरक्षण व शिकारीकामी नेण्यात आले. श्वानास जाणवळ पश्मी, भारतीय हॉउंड असेही संबोधले जाते. राजा-महाराजांसह शेतकऱ्यांकडून यांचा शिकारसाठी उपयोग होत होता.

हिंस्त्र वन्यप्राण्यांनी हल्ला केल्यास बचावाकरिता या श्वानांच्या कॉलर बेल्टला खिळे लावले जात होते. पश्मी श्वानांच्या कानावर, पंजावर, मांडीवर जास्त प्रमाणात केस आढळतात. वातावरणानुसार केस वाढ पाहवयास मिळते. प्रामुख्याने रंग काळा, राखडी, सोनेरी, कत्था, पांढरा असतो. यांची मान बारीक, लवचिक, ओठ घट्ट चिकटलेले, कान लांब व खालील बाजूस झुकलेले, शेपटीच्या टोकाशी अंगठीप्रमाणे अर्थ वेटोळा पाहवयास मिळतो. ते २४ ते ३० इंचांपर्यंत वाढून १७ ते ३८ किलो वजनाचे असतात. चपळ, सहनशक्ती खूप, शांत, धाडसी, अलर्ट अशी अनेक वैशिष्ट्ये या श्वानांची आहेत. विशेषतः या श्वानांचा उपयोग संरक्षणकामी होतो, असे डॉ. पंडीत नांदेडकर यांनी सांगितले. २००८ या वर्षातील लातूर गॅझेटमध्ये पश्मी श्वानाचा १९२५ पासून शिकारीसाठी उपयोग होत असल्याच्या नोंदी आहेत. पश्मी श्वान नोंदणी प्रस्ताव राष्ट्रीय पशू अनुवांशिक संशोधन ब्युरो (कर्नाल, हरियाना) येथे डिसेंबरमध्ये दाखल केला गेला आहे. येथील शास्त्रज्ञांच्या चमूने सप्टेंबरमध्ये लातूर व आजूबाजूच्या भागांत हे श्वान जैवविविधता सांभाळून असल्याचे मत नोंदविले होते. आजघडीला देशात या श्वानांची संख्या पाच हजारांवर पोहोचली आहे.

*विजेच्या कडकडाटानंतर झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे घर जळाले, लाखोंचे नुकसान. बीड तालुक्यातील मैंदा येथील संजय सोपानराव घुमरे यांच्या घराला विजेच्या कडकडाटानंतर झालेल्या शॉर्ट सर्किटने आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यांच्या राहत्या घरात कपड्याचे दुकान, ब्युटी पार्लर आदी व्यवसाय सुरू होते. ते सर्व जळून खाक झाले असून घरातील गृह उपयोगी साहित्य देखील यामध्ये संपूर्णतः जळाले आहे.. जवळपास ४ लाखांपेक्षा अधिकचे नुकसान*



*झाल्याचा अंदाज आहे. ही आग विझवण्याचा प्रयत्न केला गेला मात्र त्यात यश आले नाही.. संजय घुमरे यांचे या आगीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.*



### जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांचे कार्यालय

**शासकीय ईमारत, चांदमारी वसाहत, धानोरा रोड, बीड- ४३११२२**

**दुरध्वनी क्र.**०२४४२-२२२५८६ **ई-मेल** dsorbeed@yahoo.com

क्रमांक/आस्था-२/एस. आर. १६२ / २०२३ | बीड दिनांक- २५/०४/२०२५

**जाहीर सुचना**

प्रति,
अपीलदार: १. शाहराव बाजीराव भावले, रा. धानगरवाडी, पो. पाली, ता. जि. बीड
विरुध्द

जाबदार :
१. तुळशीराम राघु भावले.
२. अशोक सखाराम भावले,
३. आश्रुबा नागु भावले.
४. रंगनाथ सुदाम भावले,
५. सखाराम लिंबा भावले.
६. सुग्रीव लक्ष्मण भावले,
७. कमल तुळशीराम भावले.
८. सुक्शाला कालीदास भावले,
९. मोहन लिंबाजी भावले.
१०. जगन्नाथ लिंबा भावले.
११. बाजीराव तुका लकडे,
१२. राजाराम तुका भावले,
१३. भाऊसाहेब नागु भावले,
१४. रावसाहेब नागु भावले,
१६. यशवंता दशरथ भावले.
१५. चत्रभुज दशरथ भावले,
१७. बंड महादेव भावले.
१८. मधुकर धोंडीबा भावले,
१९. सुग्रीव धोंडीबा भावले,
२०. लिंबाजी राघुजी भावले (मयत) वारस
२०.१. जगन्नाथ लिंबाजी भावले,
२०.२. मोहन लिंबाजी भावले,
२१. बापुराव तात्याहरी भावले,
२२. विमल चत्रभुज भावले,
वरील सर्व रा. धनगरवाडी, पो.पाली, ता.जि.बीड
२३. उप अधीक्षक भूमि अभिलेख, बीड

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करण्यात येते की, अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचेविरुध्द जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांचे न्यायालयात मौजे धनगरवाडी तहत मंझेरी हवेली ता.जि.बीड येथील सर्व्हे नंबर ९९ हिस्सा क्र. १ मधील पोटहिस्सा मोजणी फाळणी फेरफार रद्द करणे बाबत महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील अर्ज दाखल केलेले आहे.

वरील गैरजअर्जदार यांना जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, वरील प्रकरणी दिनांक २८/०५/२०२५ रोजी वेळ सकाळी ११:३० वाजता जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे कार्यालय, चाँदमारी शासकीय वसाहत, पालवण चौकाजवळ, धानोरा रोड, बीड ता. जि. बीड यांचे समोर सुनावणी आहे. वरील नमुद गैरअर्जदार यांनी नमुद तारखेस न्याय कक्षेत सुनावणीस उपस्थीत रहावे.

**वरील नमुद गैरअर्जदार, वरील नमुद तारखेस गैरहजर राहील्यास प्रकरणात एकतर्फी सुनावणी येईल व प्रकरण पुढे चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

शिक्का

**स्वाक्षरीत/-**
**(कृष्णा शिंदे)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड**

### जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात बीड, ता. जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८२०/२०२५**
CNR No. MHBI020016672025
**मिरा वि. निरंक**

अर्जदार :१. मिरा भ्र. गिन्यानदेव राठोड वय- ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. लक्ष्मीआई तांडा, नाळवंडी ता. जि. बीड, २. संकेत पि. गिन्यानदेव राठोड वय- १८ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. लक्ष्मीआई तांडा, नाळवंडी ता. जि. बीड, ३. राधाबाई भ्र. गोवर्धन राठोड वय - ७५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. लक्ष्मीआई तांडा, नाळवंडी ता. जि. बीड, ४. गोवर्धन पि. लक्ष्मण राठोड वय- ७६ वर्षे, धंदा - शेती, रा. लक्ष्मीआई वांडा, नाळवंडी ता. जि. बीड
विरुध्द निरंक

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.**

वरील अर्जदार क. १ ते ४ यांनी या न्यायालयात मयत गिन्यानदेव गोवर्धन राठोड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत गिन्यानदेव गोवर्धन राठोड यांचा मृत्यु दिनांक २०/१०/२०१४ रोजी लक्ष्मीआई तांडा, नाळवंडी ता. जि. बीड येथे त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयाताची पत्नी असून अर्जदार क. २ हा मुलगा आहे. अर्जदार कं. ३ ही आई आहे. तसेच अर्जदार कं. ४ हे मयताचे वडील आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत गिन्यानदेव गोवर्धन राठोड यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दैनिक मराठवाडा पत्र मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर गुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदार हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख १३/०६/२०२५. आज दिनांक १६ माहे मे २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**(मार्फत- अॅड. टेकाडे वाय. एस.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करणेत येते की, आमचे पक्षकार / जाहीर प्रगटन देणार ना **श्री. अक्षय किशोर वीर** रा. शिवाजीनगर, बीड ता. जि. बीड यांनी खालील वर्णनातील जमीन / मिळकत मालक व कब्जेदार **श्री. रामेश्वर रघुनाथ राऊत** रा. पाली ता. जि. बीड यांच्या मालकी व ताब्यातील मोजे व ग्रामपंचायत पाली ता.जि.बीड येथील स.नं. / गट नं. ८०४ मधील ० हे. ०६.५६ आर जमीन कायमस्वरुपी खरेदीचा ठराव केलेला आहे. सदरील जमीन ही राष्ट्रीय महामार्गालगत असून यामधील काही क्षेत्र राष्ट्रीय महामार्गामध्ये संपादित झालेले आहे. त्यामुळे जेवढे क्षेत्र शिल्लक राहिल, ते संपूर्ण क्षेत्र कायमस्वरुपी खरेदीचा ठराव केलेला आहे. ज्याची चतु:सिमा- पुर्वेस - अस्मीता परेश मोरे, पश्चिमेस - राष्ट्रीय महामार्ग, दक्षिणेस - रविंद्र राजेंद्र पवार, उत्तरेस - अस्मीता परेश मारे

येणे चर्तु:सिमे अंतर्गत येणारा जमीन जाहीर प्रगटन देणार यांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचा ठराव केला असून जमीन/मिळकत मालकांनी सदर मिळकत निर्विवाद असल्याचा विश्वास व भरवासा दिला आहे.

या उपर सदर जमीन/मिळकती बाबत कोणाचे काही हितसंबंध, दान, गहाण, तारण, बक्षीस, कर्ज, वारस हक्क, देवाण घेवाण, चोळी बांगडी, मुखत्यारपत्र, इसारपावती वा अन्य आक्षेप असतील तर संबंधितांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ०८ दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राचे पुराव्यासह खालील पत्यावर आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणाचेही आक्षेप न आल्यास सदर प्लॉट निर्विवाद असल्याचे ग्राह्य धरून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.
बीड
दिनांक २१/०५/२०२५

**मार्फत**
**अॅड. योगेश सुभाषराव टेकाडे**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बीड**
**मो.नं. ९४०४२२७२४०**

**जाहीर प्रगटन देणार**
**श्री. अक्षय किशोर वीर**
**रा. शिवाजीनगर, बीड**
**ता. जि. बीड**

### जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १८२४/२०२५**
**अर्जुन रामचंद्र काकडे विरुध्द ग्राम पंचायत कार्यालय, जरुड**

पहा
१. अर्जुन रामचंद्र काकडे, रा. जरूड ता. जि. बीड.

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक आरूष अर्जुन काकडे यांचा दिनांक- ०८/०६/२०१८ रोज़ी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहून अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास जरूड ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.बीड जरुड ता. जि. बीड येथील जन्म - मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/०५/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख १६/०६/२०२५ ही आहे.

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार,**
**बीड.**

शिक्का

दैनिक ● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
शुक्रवार, दि.२३ मे २०२५ पान ४

## परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी नविन नोंदणी मालिका सुरू करण्यात येणार

**बीड । प्रतिनिधी**

परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी नोंदणी मालिका MH23BM ही सद्यस्थितीत सुरु असून सदर मालिकेतील नोंदणी क्रमांकाचे वाटप संपत आलेले आहेत. त्या अनुषंगाने परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी MH23 BP ०००१ ते ९९९९ ही मालिका दि. ०३ जून२०२५ पासून सुरु करण्यात येईल. ज्या वाहन धारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावयाचा असेल त्यांनी आपला विहीत नमुन्यातील अर्ज, सदरील आकर्षक क्रमांकाला लागू असलेली फी च्या रकमेचा, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांच्या नावाचा धनादेश वा धनाकर्ष ( Deamand Draft ) व आपल्या ओळखपत्राच्या व आधार कार्डच्या साक्षांकीत प्रतीसह दि. २६ मे ते ०२ जून २०२५ रोजी दुपारी २.०० पर्यंत कॅश काऊंटर खिडकी क्र. ०२ ▶▶ उर्वरित पान २ वर

# माजलगाव शहरातील अंडरग्राउंड गाळ्यातील दुकानदार, ग्राहकाचे आरोग्य धोक्यात न. प. चे दुर्लक्ष

### तर सोळंके कॉम्प्लेक्स समोर पाणीच पाणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील मेन रोड वरील प्रत्येक बिल्डिंग मालकाने तळग्रहात गाळे काढुन आपले उत्पन्न वाढवले त्यास माजलगाव नगरपालिकेने परवानग्या दिल्या मात्र सदर अंडर ग्राउंड गाळ्याची स्वच्छता कोण करणार यामुळे डासाचा प्रदुर्भाव वाढून दूकानदार व ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे त्यामुळे माजलगाव नगर पालिकेने वेळीच लक्ष घालून संबंधितला नोटीस पाठवून स्वच्छता मोहीम राबवावी अशी मागणी व्यापारी व ग्राहक वर्गातून केली जात आहे. माजलगाव शहर व ग्रामीण विभाग जिल्ह्यात सधन विभाग म्हणून ओळखला जातो त्या मुळे येथील बाजार पेठेत रोज मोठी उलढाल होते त्यामुळे अनेक तरुणांनी आपला व्यवसाय चांगल्या प्रकारे व्हा वा म्हणून अनेकांचा मुख्य रस्त्यावरच दुकान थाटण्याचा अट्टाहास असल्यामुळे मुख्य रस्त्यावरील प्रत्येक बिल्डिंग मालकाने तळघरात गाळे काढले आहेत त्यामुळे जागा मिळेल तिथे तरुण वर्ग आपला व्यवसाय थाटत चालू आहे मात्र माजलगाव शहरातील मुख्य रस्त्याची उंची वाढल्याने आणि रोड लगतच्या नाल्या तुंबल्याने पाणी आणि

▶▶ उर्वरित पान २ वर



### ●माजलगाव नगरपालिकेने मान्सून पूर्व स्वच्छता न केल्यास तीव्र आंदोलन करणार : विठ्ठल सोळंके

माजलगाव शहरातील मुख्य रस्त्या आजूबाजूला अनेक बिल्डिंगमध्ये तळघरात गाळे निर्माण केलेले आहेत मुख्य रस्त्यावरील नाल्या तूबल्यामुळे हे सर्व पाणी गळयात व मुख्य रस्त्यावर शीरत आहे त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी निर्माण होत आहे यामुळे व्यापारी आणि ग्राहक वर्गाच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे नगरपालिकेने वेळीच लक्ष देऊन मान्सून पूर्व स्वछता करावी अन्यथा न. प समोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा विठ्ठल सोळंके यांनी दिला आहे.

### ●माजलगाव नगरपालिका जनतेच्या आरोग्याशी खेळ खेळत असेल तर जनतेने कर का भरावा : डॉ. बांडगे

*माजलगाव शहरात सर्वत्र दुर्गंधीचे साम्राज्य आहे जिकडे तिकडे कचऱ्याचे ढीग आहेत पाऊस पडल्यावर अंडरग्राउंड गाळ्यात नालीचे पाणी जात आहे त्यामुळे व्यापारी आणि ग्राहकांना नाहक डासांचा त्रास सहन करावा लागत आहे डासामुळे डेंगू, मलेरिया सारखे आजार वाढत आहेत त्यामुळे नगरपालिका जर माजलगाव शहरातील जनतेच्या आरोग्याशी खेळ खेळत असेल तर जनतेने कर का भरावा अशा प्रश्न डॉक्टर बाडगे यांनी उपस्थित केला तर पावसाळ्यात रस्त्याने नीट चालता ही येत नाही प्रत्येकाला गुडघ्याच्या वर आपले कपडे सरकावे लागत असतील तर ही नगरपालिका मुरगडाच म्हणावी लागेल त्यासाठी जनतेने मान्सून पूर्व स्वच्छता करण्यासाठी माजलगाव नगरपालिकेवर दबाव वाढवण्याची गरज असल्याचे सांगितले.

### ●माजलगाव शहराला कोणी वाली आहे की नाही ?

माजलगाव शहराला पुढाऱ्यांचे शहर म्हणून ओळखले जाते मात्र माजलगाव शहरावर स्वच्छतेच्या बाबतीत नगरपालिकेच्या दृष्टी दिसून येत आहे शहरात सर्वत्र कचराच कचरा रस्त्यावर सर्व घाणीचे पाणी याबाबत मात्र सर्वच पक्षाची पुढारी मुग गिळुन गप्प आहेत तर माजलगाव चे आमदार म्हणून आमदार प्रकाश दादांनी मुख्याधिकारी यांना धारेवर धरून स्वच्छता करून घेणे गरजेचे आहे मात्र तसे होता ना दिसत नाही अनेक व्यापाऱ्यांनी स्वच्छतेच्या बाबतीत आमदार सोळंके यांच्याकडे तक्रार करण्यासाठी प्रयत्न केले मात्र संबंधित याचे फोन न उचलण्याचे काम माजलगाव चे आमदार महोदय करत असल्याचे दिसून येते सध्याच्या काळात त्यांना जनतेची गरज नसल्याचे दिसून आले.



*थांबा..आणि पहा हा राष्ट्रीय महामार्ग आहे.... राष्ट्रीय महामार्गावरील सिरसदेवी फाट्यावर (गेवराई) गेल्या दोन वर्षापासून तलावाचे स्वरूप आहे... गेल्या वर्षी पूर्ण पावसाळा गेला तरी दुरुस्ती झाली नाही. दरवर्षी हीच परिस्थिती आहे. या वर्षी तरी दुरुस्ती होईल हीच अपेक्षा...*

# अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रक,चालक पोलिसांच्या ताब्यात

### सहा लाख तीस हजाराचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये वाळू उपसा व वाहतुकीवर बंदी असताना देखील काही वाळू माफिया अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करत असल्याचे चित्र बीड जिल्ह्यात पहावयास मिळत आहे.

बीड जिल्ह्यातील आष्टी मध्ये वाळू भरलेला ट्रक येत असल्याची गोपनीय माहिती मिळाली असता आज दिनांक २२ मे रोजी पोलीस स्टेशन आष्टी




पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये ट्रॅक अडवून त्याची तपासणी केली असता, त्यामध्ये वाळू असल्याचे निदर्शनास आल्याने ट्रॅक पुढील कारवाईसाठी ट्रक सह चालक ताब्यात घेतला. विकास नवनाथ पवार, वय २८ वर्ष रा. विमानगाव ता.आष्टी असे चालकाचे नाव असून तो विनापरवाना वाळू वाहतूक करत असल्याचे त्याने कबूल केले.वाळू व वाहनाची किंमत असा सहा लक्ष तीस हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अवैध रित्या विना परवाना वाळूची वाहतूक केल्याने, त्याचे विरुद्ध पोलीस स्टेशन आष्टी गुरन २३४/२०२५ कलम ३०३ (२) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कार्यवाही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, प्रॉपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हा शाखा पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली झडख/ श्रीराम खटावकर, पो.हे./ अशोक दुबाले, पो. ह.सोमनाथ गायकवाड,NPC/ बाळू सानप,पो.ह.अर्जुन यादव यांनी ही कारवाई केली.

# शिवसेना (शिंदे गट) तालुका प्रमुखपदी माऊली गोंडे यांची वर्णी

**वडवणी । प्रतिनिधी**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते मा.ना. एकनाथजी शिंदे (उप-मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार शिवसेना सचिव संजय मोरे, संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी शिवसेनेच्या वडवणी तालुकाप्रमुखपदी नुकतीच माऊली गोंडे यांची निवड जाहीर करण्यात आली असून त्यांच्या या निवडी बद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथील अनेक वेळा सरपंच भूषवलेले तथा कट्टर शिवसैनिक म्हणून माऊली गोंडे यांचा वडवणी तालुक्यातील गावागावात, वाडी, वस्ती, तांड्या वरील जनमानसात दांडगा जनसंपर्क आहे. आजवर शिवसेना पक्षाने दिलेल्या सर्व



जबाबदाऱ्या पारदर्शक व गतिमान करण्यासाठी त्यांनी प्रमाणिक काम केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना सचिव संजय मोरे

यांनी वडवणी तालुका शिवसेना तालुकाप्रमुख पदी नुकतीच माऊली गोंडे यांची निवड करण्यात आली आहे. त्याच बरोबर हिंदुहृदयसम्राट

▶▶ उर्वरित पान २ वर

# आर्ट ऑफ फन डान्स अॅण्ड ॲक्टींग शिबीर उत्साहात संपन्न

### आर्ट ऑफ फनच्या बालकलावंताना सिनेमात काम करण्याची संधी देवु : अभिनेते सुधीर निकम
### राज्य स्तरावर शैकडो पारितोषिक आर्ट ऑफ फन अॅक्डमीने पटकावली : दिपाताई क्षिरसागर

**गेवराई । प्रतिनिधी**

शहरातील नामांकित आर्ट ाफ फन अॅक्डमी च्या वतीने डान्स ण्ड क्टींग शिबिराचे आयोजन १० मे ते २० मे २०२५ या दरम्यान करण्यात आले होते. दहा दिवसीय शिबीरात सिने अभिनेते, दिग्दर्शक गणेश देशमुख, रवि धुताळमल, अशोक कानगुडे, नृत्यांगना वैभवी टाकणखार




यांनी बालकलाकारांना शिबिरात प्रशिक्षण दिले. दि २० मे मंगळवार रोजी बालरंगभूमी परिषदेच्या राज्य उपाध्यक्षा सौ डॉ.दीपाताई क्षीरसागर, दिग्दर्शक अभिनेते डॉ. सुधिर निकम,नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय पाटील,पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर,शाहिर विलास सोनवणे,पत्रकार ड.शेख हारुन, ▶▶ उर्वरित पान २ वर

### जिल्हा हद्दीत ३ जूनपर्यंत ड्रोन कॅमेरा, मानवविरहीत यंत्र उडविण्यास मनाई

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय सैन्याकडून पहलगाव येथील दहशतवादी हल्ल्याचे नंतर ऑपरेशन सिंदुर राबवुन पाकिस्तान मधील दहशतवाद्यांची ठिकाणे नष्ट करण्यात आलेली आहेत. यामुळे स्लीपर सेल सक्रिय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याम ुळे ▶▶ उर्वरित पान २ वर




# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे: राजेंद्र मस्के

### विधानसभा निवडणुकीत जे झाले ते मी विसरून गेलो आहे : महेवुब शेख

**बीड । प्रतिनिधी**

काही दिवसांवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आल्या असून या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आष्टी येथे तालुका स्तरीय बैठक बोलवण्यात आली होती. जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के व प्रदेश युवक अध्यक्ष महेबूब शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली. बैठकीस जिप सदस्य सतीश शिंदे, प्रदेश सचिव अॅड.नरसिंह



जाधव, अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, तालुका अध्यक्ष परमेश्वर शेळके, संजय थोरवे, राम खाडे, मिसाळ पाटील, मिर्झा बेग, तांबेताई यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने गर्दी केली होती.

बैठकीस संबोधित करताना राजेंद्र मस्के म्हणाले की, लोकसभा व विधानसभा निवडणुका पार पडल्या, आता जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद निवडणुका म्हणजे कार्यकर्त्यांच्या निवडणुका होणार आहेत.या

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड गुरुवार दिनांक २२ मे रोजी बीड ते वडवणी रेल्वेची ट्रायल घेण्यात आली आहे. रेल्वे कामास गती येत आहे. काही महिन्यात रेल्वे सुरू होईल असा विश्वास बीड वाशीयांना वाटत आहे.*

CMYK